# My Favorite Marathi Poems

## Contents

शिशिरागम - बा.सी.मर्ढेकर....2
कितीतरी दिवसात - बा.सी.मर्ढेकर....3
टीप:....3
कांचनसंध्या - बा. भ. बोरकर....4
ने मजसी ने परत मातृभूमीला - वि. दा. सावरकर....6
तीर्थाटण – विंदा करंदीकर....8
औदुंबर - बालकवी....9
भणंग - बा. भ. बोरकर....10

# शिशिरागम - बा.सी.मर्ढेकर

शिशिरर्तुच्या पुनरागमे
एकेक पान गळावया,
का लागता मज येतसे
न कळे उगाच रडावया

पानांत जी निजली इथे
इवली सुकोमल पाखरे,
जातील सांग आता कुठे?
निष्पर्ण झाडिंत कांपरे!

फुलली असेल तुझ्या परी
बागेतली बकुलावली,
वाळूत निर्झर-बासरी
किति गोड ऊब महीतली!

येतील ही उडुनी तिथे
इवली सुकोमल पाखरे,
पानांत जी निजली इथे
निष्पर्ण झाडित कांपरे!

पुसतो सुहास, स्मरूनिया
तुज आसवे, जरि लागले,
एकेक पान गळाव्या
शिशिरर्तुच्या पुनरागमे

टीपः कवीची प्रेयसी (जिचा उल्लेख "सुहास" असा केला आहे) ती कुठेतरी दूर आहे. आणि तिच्या बकुळफुलांच्या बागेत प्रेमाची ऊब आहे, झुळझुळत्या झऱ्याचे संगीत आहे. इथली पाखरे उडून तिकडे जातील असे कवी म्हणतो. पण "माझे काय?" असा प्रश्न कवीने अश्रू पुसत सुहासची आठवण करीत केला आहे. ("सुहास" नाव वापरल्यामुळे लिहिणारी व्यक्ती ती किंवा तो दोन्ही असू शकते!) शब्दार्थः
मही - पृथ्वी, निर्झर – झरा

# कितीतरी दिवसात - बा.सी.मर्ढेकर

कितीतरी दिवसात नाही चांदण्यात गेलो ;
कितीतरी दिवसात, नाही नदीत डुंबलो

खुल्या चांदण्याची ओढ, आहे माझी हि जुनीच ;
आणि वाहत्या पाण्याची, शीळ ओळखीची तीच

केंव्हातरी चांदण्यात, पुन्हा जाईन  निर्भय ;
गावाकाठच्या नदीत, होईन मी जलमय

आज अंतरात भीती, खुल्या चांदण्याची थोडी ;
अन नदीचा प्रवाह, अंगावर काटा काढी

बरा म्हणून हा इथे, दिवा पारवा पाऱ्याचा;
बरी तोतऱ्या नळाची, शिरी धार, मुखी ऋचा .

## टीप:

कवीला बालपणच्या ग्रामीण जीवनाची ओढ आहे - जिच्यात नदीत डुंबणे आहे, चांदण्यात फिरणे आहे. शहरी जीवनाचा कृत्रिमपणा नकोसा होऊन या रम्य गोष्टींची पुन्हा आस लागलीय. हे सगळे सोडून मोकळ्या हवेत फिरण्याचा निश्चय कवी बोलून दाखवतो. पण त्याचबरोबर एक विचित्र भीतीही प्रकट करतो. शहरी जीवनाच्या कोतेपणाची - ते कृत्रिम दिव्यांचे चांदणे, पिरपिरीत नळातून येणारे पाणी - इतकी सवय झालीय की खुले चांदणे आणि नदीचा स्वैर प्रवाह झेपेल की नाही अशा विचारांनी पोटात गोळा येतोय. शेवटी चालले आहे हे बरे चाललेय असा चामडीबचावू पवित्रा कवी घेतो. शहरी माणसाच्या मानसिक दारिद्र्याचे व असाह्य अवस्थेचे चित्रण कवीने या मोजक्या शब्दात केले आहे.

# कांचनसंध्या - बा. भ. बोरकर

पिलांस फुटुनी पंख तयांची
घरटी झाली कुठे कुठे,
आता आपुली कांचनसंध्या
मेघडंबरी सोनपुटें.

(आपली मुले आता मोठी झाली आणि त्यांनी दूरदूर आपली घरे केली. आपली आता सोनेरी संध्याकाळ सुरू झाली, जणू काळ्या मेघांच्या भोवतीची सोनेरी झालर.)

कशास नसत्या चिंता-खंती
वेचू पळती सौम्य उन्हे,
तिमिर दाटता बनुनि चांदणें
तीच उमलतील संथपणे.

(सगळ्या सांसारिक चिंता आता सोडून देऊ आणि सायंकाळची झरझर धावणारी सौम्य उन्हे वेचू. अंधार पडल्यावर तीच (उन्हे) चांदणे बनून सावकाश उगवतील.)

सले कालचीं विसरुन सगळी
भले जमेचें जिवीं स्मरूं,
शिशुहृदयाने पुन्हा एकदा
या जगतावर प्रेम करूं.

(कालची दुःखे विसरून जाऊ आणि फक्त चांगल्या गोष्टींची आठवण ठेवू. एखाद्या बालकाच्या उत्साहाने या जगावर पुन्हा प्रेम करू.)

उभ्या जगाचे अश्रु पुसाया
जरी आपुले हात उणे,
तरी समुद्रायणी प्रमाणें
पोसूं तटिची म्लान तृणें.

(जगातली सर्व दुःखे दूर करणे आपल्याला अशक्य असले तरी नदी ज्याप्रमाणे काठावरील गवताच्या म्लान पात्यांना तजेला द्यायचा प्रयत्न करते तसे आपणही आपल्या कुवतीप्रमाणे इतरांना मदत करत राहू.)

इथेच अपुली तीर्थ-त्रिस्थळी
वाहे अपुल्या मुळी-तळी,
असू तिथे सखि! ओला वट मी
आणिक तूं तर देव-तळी.

(तू  देवाचं (देवासाठी बांधलेलं किंवा देवालयाजवळ असलेलं) तळं आहेस आणि तुझ्यालगत उभा असलेला मी ओला (न वठलेला) वड आहे. इथेच आपली त्रिस्थळी (काशी गया प्रयाग) यात्रा आणि हेच  माझ्या मुळाशी वाहणारं व तुझ्या तळ्यातील तीर्थ आहे.)

शिणुनी येती गुरें-पाखरें
तीच लेकरें जाण सखे,
दिवस जरेचे आले जरी त्यां
काठ जरीचा लावू सुखें...!

(सखे, दिवसभर काम करून श्रमलेली गुरे-पाखरे हीच आता आपली लेकरे समज. त्यांना आता वृद्धत्वाचे दिवस आले असले तरी त्यांना आपण आनंद देण्याचा प्रयत्न करूयात.)

रसग्रहण: अभय बि. जोशी (abjoshi@yahoo.com)

# ने मजसी ने परत मातृभूमीला - वि. दा. सावरकर

ने मजसी ने परत मातृभूमीला । सागरा, प्राण तळमळला
भूमातेच्या चरणतला तुज धूतां । मी नित्य पाहिला होता
मज वदलासी अन्य देशिं चल जाऊ । सृष्टिची विविधता पाहू
तइं जननी-हृद् विरहशंकितहि झालें । परि तुवां वचन तिज दिधलें
मार्गज्ञ स्वयें मीच पृष्टि वाहीन । त्वरित या परत आणीन
विश्वसलो या तव वचनी मी
जगदनुभवयोगे बनुनी मी
तव अधिक शक्त उध्दरणी मी
येइन त्वरें कथुन सोडिलें तिजला । सागरा, प्राण तळमळला

(सागरा, तू खरं तर माझ्या भूमातेचे पाय धुणारा सेवक आहेस. तू मला म्हणालास - चल जरा दुसऱ्या देशात फिरायला जाऊ, सृष्टीची विविधता पाहू. त्याच वेळेला माझ्या आईच्या ह्रदयात माझा तिला विरह होईल की काय अशी शंका आली. पण तू तिला वचन दिलंस, की मी मार्गज्ञ म्हणजे वाट माहित असणारा आहे, आणि मी याला अगदी पाठीवरून घेऊन जाईन (जहाज सागराच्या पाठीवरूनच नेलं जातं). तुझ्या वचनावर विश्वास ठेवला. तू जगभर सगळीकडे आहेस त्यामुळे जगाचा तुला अनुभव असाणार हा विश्वास आणि मलाही जगाचा सुंदर अनुभव यावा ही इच्छा या दोन्हीच्या योगे मी 'बनलो' (तयार झालो आणि फसलो). तुझ्या उद्धरणशक्तीवर (buoyancy किंवा उद्धार करण्याची शक्ती) विश्वास ठेवला. लवकर येईन असं सांगून मी तिला सोडलं - भारताचा किनारा सोडला.)

शुक पंजरिं वा हरिण शिरावा पाशीं । ही फसगत झाली तैशी
भूविरह कसा सतत साहु यापुढती । दशदिशा तमोमय होती
गुण-सुमनें मी वेचियली ह्या भावें । कीं तिने सुगंधा घ्यावें
जरि उध्दरणी व्यय न तिच्या हो साचा । हा व्यर्थ भार विद्येचा
ती आम्रवृक्षवत्सलता रे
नवकुसुमयुता त्या सुलता रे
तो बाल गुलाबही आता रे
फुलबाग मला हाय पारखा झाला । सागरा, प्राण तळमळला

(पोपट पिंजऱ्यात किंवा हरिण पारध्याच्या पाशात सापडावा तसा मी फसलो. भारतमातेचा विरह इथून पुढे कसा सहन करू? सर्वबाजूंनी अंध:कारमय झाल्यासारखं वाटतंय. मातेला सुगंध देता यावा यासाठी मी काही ज्ञानपुष्पे गोळा केली. तिच्या उद्धारासाठी उपयोग होणार नसेल तर माझी सर्व विद्या व्यर्थ आहे. (मला काय काय आठवतं?) माझ्या देशातल्या आम्रवृक्षांची वत्सलता, त्या फुललेल्या सुंदर वेली आणि तिथला छोटा सुगंधी गुलाब. हा बगीचा आता मला पारखा झाला.)

नभि नक्षत्रें बहुत एक परि प्यारा । मज भरतभूमिचा तारा
प्रासाद इथे भव्य परी मज भारी । आईची झोपडी प्यारी
तिजवीण नको राज्य, मज प्रिय साचा । वनवास तिच्या जरि वनिंच्या
भुलविणे व्यर्थ हे आता रे
बहु जिवलग गमते चित्ता रे
तुज सरित्पते जी सरिता रे
तद्विरहाची शपथ घालितो तुजला । सागरा, प्राण तळमळला

(आकाशात नक्षत्रे अनंत आहेत, पण मला एकच - माझ्या भरतभूमीचा - तारा प्रिय आहे. इथे मी भव्य प्रासादतुल्य घरांतून राहात असेन पण मला माझ्या आईची झोपडीच प्रिय आहे. राज्य तर नकोच आहे पण वनवास सुद्धा तिच्याच वनातला हवा आहे (तुरूंगात घातलं तरी भारतातल्या तुरूंगात यांनी घालावं). तुझे हे भुलविणे आता व्यर्थ आहे. हे सरित्पते, म्हणजे सरितांचा पती, तुला जिवलग वाटणाऱ्या सरितेचा तुला विरह होईल अशी मी तुला शपथ घालतो.)

या फेन-मिषें हससि निर्दया कैसा । का वचन भंगिसी ऐसा
त्वत्स्वामित्वा सांप्रत जी मिरवीते । भिउनि का आंग्लभूमीतें
मन्मातेला अबल म्हणुनि फसवीसी । मज विवासनातें देशी
तरि आंग्लभूमी-भयभीता रे
अबला न माझिही माता रे
कथिल हें अगस्तिस आता रे
जो आचमनी एक पळीं तुज प्याला । सागरा, प्राण तळमळला

((त्याच्या उसळून फुटून फेसाळणाऱ्या लाटांकडे निर्देश करून) हे निर्दयी सागरा, तू फसफसून हसतो आहेस, मला (व माझ्या भारतमातेला) दिलेले वचन तू भंग केले आहेस. तुझी सध्याची स्वामिनी - जी आंग्लभूमी आहे - तिला तू भितोस आणि तिला भिऊन माझ्या मातेला अबला म्हणून फसवितोयस, मला विजनवास देतो आहेस. पण अरे, आंग्लभूमीला भिणाऱ्या भित्र्या खलपुरूषा, माझी माता (भारतभूमी) ही देखील अबला नाही, ती तुझे कुकर्म अगस्ती ऋषींना कळवेल. ज्या अगस्तींनी तुला पूर्वी एका घोटात पिऊन टाकले होते!)

Notes by: Abhay B. Joshi (abjoshi@yahoo.com)

## तीर्थाटण – विंदा करंदीकर

तीर्थाटण मी करीत पोचलो
नकळत शेवट तव दारी;
अन तुझिया देहात गवसली
सखये मजला तीर्थे सारी
अधरावरती तव वृंदावन
प्रयाग सापडले नेत्री;
भालावरती ते मानसरोवर,
मानेवरती गंगोत्री
गया तुझ्या गालात मिळाली
रामेश्वर खांद्यावरती
मिळे द्वारका कमरेपाशी
अन काशी अवतीभोवती
मोक्षाचीही नुरली इच्छा
नको कृपा याहून दुसरी
तीर्थाटण मी करीत पोचलो
नकळत शेवट तव दारी.

टीप: स्त्रीदेहाचे अनिवार आकर्षण आणि अप्रूप ही सर्वच पुरूषांना मिळालेली देणगी आहे. ही कविता वाचल्यावर विंदादेखील या सदरात मोडतात हे पाहून बरे वाटते. अर्थात त्यांच्यातला enlightened पुरूष हे जाणतो की स्त्रीदेह ही केवळ भोगवस्तू नसून ते एक मोक्षाचे साधन आहे. स्त्रीच्या सहवासात अपरिमित आनंद तर मिळतोच, पण जाणत्या पुरूषाला आध्यात्मिक अनुभव मिळतात. त्याच्या दृष्टीने तो सहवास एकप्रकारचे meditation होऊन जाते.

## औदुंबर - बालकवी

कवी: बालकवी. (त्र्यंबक बापुजी ठोंबरे)

ऐलतटावर पैलतटावर हिरवाळी घेऊन
निळासावळा झरा वाहतो बेटाबेटातून.
चार घरांचे गाव चिमुकले पैल टेकडीकडे
शेतमळ्यांची दाट लागली हिरवी गरदी पुढे.

पायवाट पांढरी तयातुनि अडवीतिडवी पडे
हिरव्या कुरणामधुनी चालली काळ्या डोहाकडे.
झाकोळुनी जळ गोड काळिमा पसरी लाटांवर
पाय टाकुनी जळांत बसला असला औदुंबर.

## भणंग - बा. भ. बोरकर

भटकत फिरलो भणंग आणिक
मिळेल तेथे पाणी प्यालो,
जुळेल तेथे खूण जुळविली
तरि होतो हा तसाच उरलो

शिंपित आलीस तोच माधुरी
सहज नाचऱ्या डोळ्यांमधली,
सांडावी जशि थेंबांची सर
चांदण्यात कुणि झाडाखाली

आणि कालची तहान मेली
गळ्यात कोरड दुसरी आज,
व्यर्थ नव्हे का ओंजळ जेथे
शरीर सारे म्हणते पाज!

ओठ वाळला कालचा तरि
आज निराळी लाही त्यावर;
शब्दांचे कुणि करोत चमचे,
'आ' बनले हे सारे अंतर!